VIDYABHARATI Vidyabharati International Interdisciplinary Research Journal
ISSN 2319-4979

हवामान बदलाचे राजकारण आणि जागतिक प्रशासन

प्रा. ज्योती खंदारे
सहाय्यक प्राध्यापक, मिलिंद महाविदयालय मुळावा
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
kalbandejyoti1971@gmail.com

सारांश
निसर्गाचा वाढता असमतोल ,पृथ्वीचे तापमान वाढ, औद्योगिक विकास यामधून पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे त्यामुळे जागतिक हवामानात बदल झालेला असून ही समस्या जागतिक समस्या आज बनलेली आहे आणि या जागतिक समस्येचे गंभीर परिणाम संपूर्ण मानव जातीस भोगावे लागत आहे विकसित देश आणि विकसनशील देश यांच्यातील समन्वयाचा अभाव यामुळे हवामान बदलाच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे आणि त्यामुळे विकसनशील राष्ट्रांमधील नागरीकांचे अस्तित्व धोक्यात येत आहे जागतिक स्तरावर आत्तापर्यंत झालेल्या विविध परिषदा ,करार यामध्ये हवामान बदलावर चर्चा झाली पण योग्य तो तोडगा निघालेला दिसत नाही जागतिक स्तरावर विशेषतः युरोपीय देशांमध्ये पर्यावरण समतोल या विचारधारेवर आधारित हरित पक्ष स्थापन झाले पण त्यांना सत्तेच्या राजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व न मिळाल्यामुळे या समस्येवर तेथील सरकारला योग्य ते कायदे करता आलेले नाहीत भारत व जगातील विविध देशांमध्ये आज पर्यावरण विषयक चळवळी सक्रियपणे काम करीत आहे पण त्यांना समस्या निवारणार्थ यश अजून आलेले दिसत नाही हवामान बदलाचा जगावर परिणाम होतो त्यामुळे विकसित व विकसनशील राष्ट्रांनी या समस्येच्या गंभीरतेचा विचार करून सहकार्याच्या भूमिकेतून हा प्रश्न सोडविला जाऊ शकतो

प्रस्तावना

जागतिक स्तरावर विचार केल्यास आज हवामान बदल हे जागतिक संकट बनलेले आहे मानवनिर्मित दूषित पदार्थांमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे जागतिक पातळीवर वाढती लोकसंख्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाची अनियंत्रित प्रक्रिया यामधून पर्यावरणाची प्रदूषण वाढले आहे एका राष्ट्रातील पर्यावरणातील प्रदूषणाचे दुष्परिणाम दुसर्या राष्ट्राला भोगावे लागतात हवामान बदलाचे जागतिक पातळीवर भयंकर दुष्परिणाम दिसत आहे वैश्विक तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे सन 2050 पर्यंत पृथ्वीचे तापमान दोन अंश ते 11 अंश सेल्सिअस मध्ये वाढण्याची शक्यता आहे

जागतिक हवामान बदलाच्या आव्हानामुळे उद्भवलेल्या बहुआयामी सामाजिक संकटांनी जगभरातील प्रशासन संरचना आणि प्रणालींना वेढले आहे वैश्विक तापमान वाढीस सर्वात मोठे कारण हे मानवनिर्मित आहे औद्योगीकरणाच्या प्रक्रियेद्वारा कार्बन डायऑक्साइड मिथेन नायट्रस ऑक्साइड सल्फर हेक्सा फ्लोराइड सारखे वायू हवेत मिसळले जात आहेत रासायनिक खतांचा भरमसाठ वापर यामुळे ग्लोबल वॉर्मिंगचे संकट वाढले त्यातून मोठ्या नैसर्गिक आपत्ती पूर दुष्काळ समुद्राच्या पातळीत वाढ यासारख्या तीव्र हवामानाच्या समस्या उद्भवतात नुकताच 26 ऑगस्ट 202 6 च्या सकाळी नेपाळमधील रि सूवा त्रिशुली नदीमध्ये अचानक पूर व भूखलनाच्या अनेक घटना घडल्या अनेक घरे जमीन दोस्तझाली चीन नेपाळ सीमेवरील गिरोंग बंदर संकुल की जे दोन्ही देशांमध्ये व्यापार आणि पर्यटनाचे प्रमुख प्रवेशद्वार होते ते नष्ट झाले. नेपाळमधील पूरस्थिती चा भारतातील अनेक राज्यांवर परिणाम झाला बिहारमधील पुर आणणार्या जवळपास सर्व प्रमुख नद्यांचा उगम नेपाळमध्ये होतो या मुळेबिहार बरोबरच उत्तर प्रदेश गोरखपुर श्रावस्ती लखीम पूर खिरी या जिल्ह्यांना सुद्धा झाला हवामान बदलाच्या संकटाचा परिणाम जागतिक पातळीवर होतो अनेक वेळा त्यामुळे पायाभूत सुविधा आणि संसाधनांवर इतका वाईट परिणाम होतो की त्याची भरपाई होऊ शकत नाही

पूर्वअभ्यासाचा आढावा

हरित राजकारण व हवामान बदलाचे संकट यावर अनेक अभ्यासकांनी महत्वपूर्ण अभ्यास केलेले आहेत

१) ब्लॅक स्टेज क्लायमेट बुक रिव्ह्यू, राजन मेहता
२) हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी जबाबदार प्रशासन गरजेचे लेखक अंबर कुमार घोष
३) Green politics in India, A think Article by Sonakshi Yadav, young India Foundation 4 May 2020

हवामान बदला चे राजकारण

आज जागतिक पातळीवर ग्लोबल वार्मिंग ची समस्या रौद्ररूप धारणकरत आहे त्याचा परिणाम अखिल मानव जातीच्या मूलभूत सुविधांवर पडताना दिसत आहे शेतीच्या कामात मोठ्या प्रमाणात व्यत्यय येतो आहे ज्यामुळे अन्न सुरक्षिततेचे संकट येऊ शकते इतकेच नाही तर मंदी, आर्थिक अस्थिरता आणि सामाजिक आर्थिक विषमता वाढण्या चा ही धोका निर्माण होतो जागतिक पातळीवर अशांतता संघर्ष मानवी विस्थापन आणि सामाजिक स्थिरतेची परिस्थिती निर्माण होतो हवामान बदलाच्या घटना वारंवार घडत आहे विशेषतः विकसनशील राष्ट्रांमध्ये नागरिकांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे राजधानी दिल्लीतील वायू प्रदूषणात धोकादायक वाढ झाली असून तेथील प्रदूषण हे सामान्यांसाठी किती घातक आहे हे नुकतेच जाहीर करण्यात आले हवामानातील तीव्र घटनांची वाढती वारंवारता तसेच त्यांची तीव्रता यामुळे सर्व सामान्यांचे विशेषता विकसनशील राष्ट्रांमध्ये नागरिकांचे अस्तित्वच धोक्यात येत आहे हे भारताने कॉप 29 या हवामान विषयक परिषदेत अधोरेखित केले विकसनशील देशांमध्ये पर्यावरण धोरण राबविताना विकसित देशांनी त्यांना पाठिंबा देण्याचे धोरण वाढविण्याचे आवाहन भारताने केले आहे विकसनशील जग हवामान बदलाच्या परिणामांनी मोठ्या प्रमाणात त्रस्त असून ते मुख्यतः विकसित देशांच्या उत्सर्जनाचा परिणाम भोगत आहे हे भारताने ठामपणे सांगितले कॉप 29 मध्ये स्वीकारण्यात आलेल्या जागतिक हवामान लवचिकतेच्या संयुक्त अरब अमिरा तिच्या आराखड्यात विकसित देशांकडून वाढीवपाठिंब्याच्या तातडीच्या गरजेवर भर देण्यात आला या चे स्मरण भारताने करून दिले ग्लोबल नॉर्थ आणि ग्लोबल साउथ या दोन्ही संकल्पनांद्वारे ज्या जागतिक आर्थिक आणि पर्यावरणीय संकल्पना स्पष्ट केली जातात ग्लोबल नॉर्थ मध्ये अमेरिका ,युरोप, जपान ,ऑस्ट्रेलिया या विकसित देशांचा समावेश होतो. ग्लोबल साऊथ मध्ये भारत, आफ्रिका दक्षिण अमेरिका या विकसनशील देशांचा समावेश होतो आणि या देशांनी मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्सिड आणि इतर हरितगृह वायूचे विसर्जन केले त्यामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होऊन विकसनशील देशांमध्ये भूकंप ,पूर गारपीट ,वादळ यासारख्या विपरीत हवामान बदलाच्या परिणामांना त्यांना सामोरे जावे लागते पर्यावरणातील हे बदल पाण्याची उपलब्धता तसेच अन्न सुरक्षा यांच्याशी थेट निगडित आहे पर्यावरणातील बदलांमुळे विकसनशील देशांना मोठी किंमत चुकवावी लागते ग्लोबल नॉर्थ मधील देश देखील औद्योगीकरणामुळे झालेल्या आर्थिक विकासामुळे आज विकसित राष्ट्रांमध्ये त्यांचा समावेश होतो त्यांनी धन संचय करताना पर्यावरणाला अक्षरशः ओरबाडले त्याचा परिणाम विकसनशील देशांवर झाला आहे या देशांना नुकसान भरून काढण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानात्मक किंवा आर्थिक मदत मिळत नाही त्यामुळे ते बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकत नाही ग्लोबल साउथ मधील देशांमध्ये पर्यावरणीय संकटामुळे जलसंपदा शेती आरोग्य यासारख्या आधारभूत सुविधांची नुकसान होते त्याचा परिणाम स्थानीय अर्थव्यवस्थेवर होऊन नागरिकांना स्थलांतर करावे लागते आणि त्यामुळे त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे दुष्काळामुळे त्यांची घरे जमीन उपजीविकेचे साधन त्यांना गमवावे लागते त् विकसित राष्ट्रांनी त्यांच्याजबाबदार्या ओळखत विकसनशील राष्ट्रांना मदत करणे गरजेचे आहे यामध्ये विकसनशील देशांना अर्थसहाय्य करणे, तंत्रज्ञान आणि हवामान बदलाविरुद्ध उपाय योजना राबवण्यासाठी अनुदान देण्याची आवश्यकता तीव्र झाली आहे ग्लोबल नॉर्थ ते ग्लोबल सौथ मधील जे पर्यावरण बदल होत आहे त्यामध्ये अधिक सक्रिय तसेच जबाबदारीची भूमिका बजावण्याची ही वेळ आहे त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था स्थिर होईल त्यासाठी हवामान वित्तपुरवठा म्हणजे क्लायमेट फायनान्स पुरवण्याची गरज आहे या वित्तीय साधनांचा उपयोग विकसनशील देशांना हवामान बदलाचा अनिष्ट परिणाम सामोरे जाण्यासाठी होतो यातूनच या देशांना आद्ययावत तंत्रज्ञान कार्यक्षमते त सुधारणा करणे ,नवीकरणीय ऊर्जा साधनांच्या विकासासाठी मदत घेणे शक्य होते गेल्या काही दशकांमध्ये मानवी क्रिया कला पामुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे वैश्विक तापमानात वाढ होऊन त्याचा परिणाम पर्यावरणाच्या गंभीर समस्या निर्माण होऊन विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था, कृषी, मासेमारी ,पर्यटन या क्षेत्रावर त्याचा गंभीर परिणाम झालेला दिसतो अनेक विकसित देश त्यांच्या अर्थसंकल्पात क्लायमेट फायनान्स साठी निधी मंजूर करतात खाजगी उद्योगांनी यात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे अनेक वेळा विकसनशील देशांना आवश्यक असलेला निधी उपलब्ध नसतो त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एकत्र प्रयत्न करण्याची गरज आहे योग्य नियोजन योग्य व्यवस्थापन यामधून योग्य अंमलबजावणी होऊ शकते विकसनशील देश आणि विकसित देश यांच्यातील पर्यावरणीय नियमांबद्दल चढाओढ हा प्रदीर्घ काळ चालणारा वादाचा विषय आहे

हवामान बदल आणि जागतिक प्रशासन

लोकशाही व्यवस्थेत प्रामुख्याने विविध वर्गांचे प्रतिनिधित्व असते लोकशाहीत नागरिक आपले विचार मांडू शकतात शासनासमोर आपल्या मागण्या मांडू शकतात जागतिक स्तरावर विकास आणि प्रशासन संरचनांवर परिणाम करणारी समस्या म्हणून आता हवामान बदल उदयास येत आहे ज्याप्रमाणे निवडणुकांमध्ये रोजगार ,महागाई ,भ्रष्टाचार ,अस्मितेचे राजकारण , स्थलांतर , अर्थव्यवस्था हे मतदार वर्तनाला प्रभावित करणारे महत्त्वाचे घटक आहेत त्याचप्रमाणे निवडणुकांमध्ये हवामान बदल हा प्रकर्षाने प्रत्येक राजकीय पक्षांनी जाहीरनाम्यात त्याचा समावेश, करणे आवश्यक आहे पूर ,दुष्काळ जंगलातील आग ,धान्याचा नाश इत्यादी आपत्तींमध्ये झालेल्या वाढीमुळे जगभरातील लोकांच्या चिंतेच्या केंद्रस्थानी हवामान बदल आहे थेट परिणाम आता लोकांवर होत आहे युरोपातील अनेक देशांमध्ये ग्रीन पार्टी उदयास आल्या आहेत जगातील विविध देशांमध्ये अशा प्रकारे सुमारे 80 टक्के ग्रीन पार्टी आहे या हरित पक्षांमध्ये सामाजिक आणि आर्थिक समस्यांशी संबंधित अनेक क्षेत्रांचा समावेश होतो पर्यावरण संरक्षणार्थ पहिला राजकीय पक्ष 1972 मध्ये ऑस्ट्रेलिया मध्ये 'युनायटेड टास्मानिया ग्रुप' या नावाने निर्माण झाला या पक्षाला राज्याच्या निवडणुकीत केवळ तीन टक्केच मते मिळविता आले 1973 मध्ये युरोपमधील पहिला ग्रीन पक्ष म्हणून ' युकेएस इकॉलॉजी पार्टी हा पक्ष निर्माण झाला जर्मनीत ग्रीन राजकीय पक्षांची स्थापना 1980 मध्ये झाली जर्मनीतील राजकारणात ग्रीन राजकीय पक्षांची भूमिका प्रभावी राहिली आहे काही प्रांतांमध्ये ग्रीन राजकीय पक्षांची सरकारे देखील स्थापन झाले इंग्लंडमध्ये 1973 मध्ये ग्रीन राजकीय पक्षांची स्थापना झाली पण ब्रिटनमध्ये ग्रीन राजकीय पक्षांचा प्रभाव स्थानिक निवडणुकांपुरताच मर्यादित राहिला 1995 ला ग्रीन लीग हा युरोपातील पहिला ग्रीन पक्ष आहे ज्याला राज्य पातळीवर आपले मंत्रिमंडळ बनविण्यात यश आले जर्मनीत ग्रीन पक्षाचे सोशल डेमोक्रॅटिक पार्टी सोबत युती करून 1998 ते 2005 पर्यंत सरकार स्थापन केले अमेरिकेमध्ये 2000 च्या अध्यक्षीय निवडणुकीत ग्रीन पक्षाच्या राल्फ नाडरने निवडणूक लढवून 2.7 टक्के मते मिळविली ऑस्ट्रियांमध्ये 2020 मध्ये ग्रीन पार्टीने कन्झरव्हेशन पीपल्स पार्टी सोबत युती करून सत्ता मिळवली 2004 मध्ये लेट वियाला ग्रीन पार्टीच्या इंडलिस अॅमिसस मध्ये पहिला पंतप्रधान मिळाला बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स ,न्यूझीलंड आणि इटली सारख्या देशात हरित पक्ष ही सरकारात सामील होत आहे लॅटिन अमेरिकेत ब्राझील मेक्सिको आणि कोलंबिया सारखे देश हरित पक्षांना स्वतःला बळकट करण्यासाठी आणि स्थानिक संस्थांच्या पातळीवर निवडणुकीच्या राजकारणात प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा करू शकतात आफ्रिकेतील रवांडा हा एकमेव देश आहे जिथे संसदेत ग्रीन पार्टीचे प्रतिनिधित्व केले आहे भारताच्या राजकारणात मात्र पर्यावरणावर संघटित होऊन कोणताही राजकीय पक्ष केंद्राच्या राज्याच्या राजकारणात आपले प्रतिनिधी निवडून आणू शकले नाही

निष्कर्ष

1) हवामान बदलाच्या गंभीर संकटाचा परिणाम जागतिक राजकारणावर पडलेला दिसतो

२) हवामान बदलाच्या गंभीर समस्येवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हरित राजकीय पक्षांची राजकारणातील भविष्यातील भूमिका महत्त्वाची राहील

3) जागतिक व्यासपीठावर हवामान बदल या समकालीन समस्येवर गंभीर समस्या म्हणून आज तिच्याकडे बघितले जात आहे

4) हवामान बदलाच्या संकटाचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर पडतो दुष्काळ महापूर, धान्यांचा नाश इत्यादी आपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे जगभरातील लोकांच्या केंद्रस्थानी हवामान बदल आहे

संदर्भ

1) शिंदे, ज. रा .अमृतकर डॉ. प्रशांत, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद,२०००

२) देवळाणकर ,डॉ. शैलेंद्र ,समकालीन जागतिक राजकारण, विद्या पब्लिशर्स औरंगाबाद, मार्च 2010

3) कुलकर्णी जी. एम . दीक्षित पी. पी. पर्यावरण शास्त्र, विद्या पब्लिकेशन्स, औरंगाबाद,2004

4) Guha, Asi, Environment in the Election Manifestos Economics and political weekly, vol-54 No-9 2019